


१०५८
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३९२

REFBK-0022528
REFBK-0022528

काव्य
दा. क्र. २२५२८
२।१२।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३९२ वि. क्र.
२२५२८

२२५२१
२१/१२/७८
संदर्भ
काव्य

# मानसमेघ

कवितासंग्रह

REFBK-0022528
REFBK-0022528

सौ. इंदिरा कुळकर्णी

प्रस्तावना : ग. ल. ठोकळ
ओळख : सरिता पदकी

प्रपंच प्रकाशन, पुणे ३०

प्रपंच प्रकाशन १०८

प्रकाशक :—
माधव रा. कानिटकर
१९४५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

मुद्रक :—
कृ. का. कुलकर्णी
साफल्य प्रिंटर्स
४६१/१ सदाशिव पेठ, पुणे ३०.

सर्व हक्क सौ. इंदिरा कुळकर्णी
'अनुग्रह,' २९ एकोपा सोसायटी,
सॅलिस्बरी पार्क, पुणे १

आवृत्ती पहिली :- मे १९७८

मुखपृष्ठ :— बाबू उडुपी

किंमत सहा रुपये

४३८२ १९.९५
२२५२५

# प्रस्तावना

श्रावण महिन्यातला एक दिवस. दुपार उलटून गेली आहे. आकाशात मेघांचे पुंजके इतस्ततः फिरत आहेत. त्यातले काही पिंजलेल्या कापसाप्रमाणे पांढरे आहेत, काही निळेसावळे. नुकतीच एक सर पडून गेली आहे. थंडगार वाऱ्याच्या झुळुका अंगाला कुरवाळीत आहेत. पश्चिमेच्या बाजूला आभाळाच्या कुशीमधून इंद्रधनुष्याची सप्तरंगी कमान वर सरकली आहे. जिकडें पाहावे तिकडे हिरवे हिरवेगार दिसत आहे. परसातल्या बकुल व पारिजात या झाडांच्या तळाशी फुलांची पखरण पडली आहे. अंगणातल्या गुलाबाच्या झाडांवर उमललेले टपोरे गेंद वाऱ्याच्या झुळकांनी हिंदोळत आहेत. वातावरणात या फुलांचा सुगंध सरमिसळला आहे. मन कसे तृप्त, तरल, प्रसन्न व उल्हसित आहे. सौ. इंदिराबाई कुलकर्णी यांचा 'मानस-मेघ' हा कवितासंग्रह वाचताना या वातावरणाची प्रचीती येते.

सगळे जग संकटांनी व दुःखांनी भरलेले आहे. प्रत्येक माणूस कसल्या ना कसल्या दुःखात व विवंचनेत असतो. 'सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' असे तुकाराम महाराज सांगतात, संकटाच्या आघाताने आपण दुःखी व्हायचे व जवळपासच्या सगळ्यांना दुःखी करायचे, हा व्यवहार आपण प्रत्यही पाहतो. काही माणसे मात्र संकटाशीं मुकाबला देऊन दुःख गिळून टाकतात व या परिस्थितीत-सुद्धा आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. आपल्या दुःखाचे रडगाणे गाणारे कवी अनेक आहेत. इंदिराबाई मात्र या कवीच्या मेळाव्यापासून चार हात दूर आहेत. आपल्या वाट्याला जे सुख, जी तृप्ती आली आहे, तिची मुठी भरभरून उधळण करण्यात त्या मग्न आहेत. 'दुःख माझे संपू नये' अशी जगावेगळी मागणी त्या देवाजवळ करतात.

रेंगाळत देह माझा सुखदु:ख सीमेवरी
उन्ह-छायेच्या कुशीचा साज चढें माझ्यावरी
पंचप्राण वितळावे दु:ख भोगता भोगता
गावो कंटकाची शेंज माझ्या सुखाची संहिता
लाट उरी उमलावी वेणाभरल्या भाग्याची
अनंतात शांत व्हावी माझी मासोळी देहाची
दु:खवेडी पाझरावी वर्षा शीतल संतृप्त
गारठावे, शांत व्हावे रोम रोम फुलवीत

तसेच ' सुख टिपताना ' या कवितेमध्ये

सुख टिपताना आले
पदरात दु:ख वेडे
आलेल्याला सत्कारावे
गृहस्थीचे मला धडे
परी असावी रे दु:खा
तुला सुखाची झालर
प्रारब्धाच्या मांडवाला
जपेन मी जन्मभर

सुख हे मानण्यावर आहे. दु:खाच्या मांडवाला सुखाची झालर लावण्याची कला इंदिराबाईंना चांगली साधली आहे. या प्रपंचवाईक गृहिणीच्या अंगात गृहस्थीचे धडे पुरेपूर मुरलेले आहेत.

अनादी कालापासून चालत आलेला लोकगीतांचा अमोल ठेवा भारतीय नारींनी जतन करून ठेवला आहे. मराठी भाषा त्या मानाने जुनी नाही. सुमारे सातशे वर्षांपूर्वीचा मराठी भाषेचा उद्‌गम अस्पष्टसा दिसून येतो. प्राकृताच्या पोटी नवा रंग, नवे रूप घेऊन मराठी भाषेने जन्म घेतला. त्या काळच्या स्त्रियांनी रचलेली लोकगीते आज उपलब्ध

नाहीत. गेल्या दोनतीन शतकातली लोकगीते मात्र खेडवळ स्त्रियांनी मुखोद्गत करून जतन केली आहेत. पैकी काहींचे संशोधन साने गुरुजींनीं केले. ' याच वाटेने जात जात आता मालतीबाई दांडेकर व सरोजनी बाबर हे कार्य करीत आहेत. या लोकगीतांचा अभ्यास करताना काहीं चांगल्या कवियत्रींचा आपल्याला परिचय होतो. त्यांची नावे व गावे अज्ञात आहेत. शिक्षणाचा त्यांना गंध नव्हता. पण त्यांच्या ठायी वसत असलेले काव्यगुण भारी व भर्जरी होते याची खात्री पटते. इंदिराबाईंनी या लोकगीताच्या ठेव्याचे श्रवण, वाचन व चिंतन केलेले आहे, हे त्यांच्या कविता वाचल्यावर स्पष्ट होते. लोकगीतांचा सुरेख ठसा त्यांच्या कवितांवर उमटलेला आहे. काही कवितांची जडणघडण तर अशी लाजबाब आहे की त्या कविता म्हणजे या आधुनिक कवियत्रिने रचलेली लोकगीतेच आहेत, असे म्हणावे लागेल. लोकगीत व आधुनिक या संज्ञा परस्परविरोधी आहेत. पण 'मानसमेघ' मधे त्यांचा सुंदर मिलाफ झाल्याचे दिसून येतें. 'लेक आली माहेराला' ही कविता या दृष्टींने वाचावी. तसेच 'बाळ निघाला शाळेला' ही कविता आधुनिक लोकगीत आहे की नाही ते सांगा.

'लाल चड्डी घालू तुला ?–का रे आवडे निळीच
शुभ्र शर्टांत शोभतो–बाळ माझा ग भारीच
अहो, कालच आणिले–त्याच्या पिताजींनी बूट
लाडके ना चिरंजीव – रोज पुरविती हट्ट
डावीकडे भांग खुले – मुखावर पावडर
जरा कलती घालते निळी हॅट डोक्यावर
बाळ पोचला दारात सारं मुसळ केरात
'अहो, थांबवा ना त्याला, डबा राहिला घरात ?

नवकाव्याच्या या युगामध्ये इंदिराबाई नवकाव्याच्या अनेक दोषांपासून अलिप्त आहेत. त्यांच्या काही कविता मुक्त छंदात आहेत. पण नवकाव्यात सहसा आढळून येणाऱ्या वैफल्याच्या भावनेची छाया

या कवितांवर नाही. नवकाव्यात गोडवा कमी असतो. पण बुद्धिमत्तेची चमक आढळते. ' खरं आहे तुझं ' या कवितेत बुद्धिमत्तेची चमक आहे आणि ती गोडव्याला धरून आहे.

तुझ्या माझ्या प्रवासाला निर्मू या
अकरावी दिशा
दाही दिशांचे साखळदंड तोडून
चोहोकडे पसरलेले
सारे आखीव रेखीव विस्कटून
तुझ्या माझ्या पायांना बांधू या
गुलाबाची फुले
काटयांनी रक्तबंबाळ झालो
तरी देतील सुवास कधी तरी
म्हणून म्हणते
अनंत युगांच्या व्रताचं उद्यापन करायला
प्रतिक्षेचे हात नव्या वाटेच्या साक्षीने गुंफून
करू या अनंताच्या प्रवासाला सुरुवात

नोव्हेंबर १९७७ मध्ये पुण्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ५२ वे अधिवेशन भरले होते. तेव्हा काव्यगायनाचा जो कार्यक्रम झाला त्याचे संचालन माझ्यावर सोपवलेले होते. सुमारे दहा नवीन कवींना संधी द्यायची असा काव्यगायन समितीचा निर्णय ठरला. त्याप्रमाणे ' कविता पाठवा ' असे आम्ही वर्तमानपत्रातून कवींना आवाहन केले. सुमारे चारशे कविता आल्या. त्या सर्व वाचून समितीने दहा कविता निवडल्या. त्यात इंदिराबाईंची कविता होती. ती त्यांनी गाऊन दाखवली. आकाशवाणीवर व इतरत्रही काव्यगायन करण्याचा त्यांना सराव होता. आवाजही चांगला आहे. त्यामुळे त्यांचे कवितागायन परिणामकारक झाले. त्या परिचयाच्या

आधारावर त्यांनी मला प्रस्तावनेबाबत विचारणा केली. मीही आनंदाने मान्यता दिली.

इंदिराबाईंचे सांसारिक जीवन तृप्त आहे, हे हा संग्रह वाचताना आढळून येते. त्यांनी हे पुस्तक त्यांचे मिस्टर श्री. कुलकर्णी यांना अर्पण केले आहे. श्री. कुलकर्णी यांनी त्यांना लिहिण्यासाठी आयुष्यभर प्रोत्साहन दिले. तेव्हा ज्याचे त्या देणे लागत होत्या ते त्यांनी देऊन टाकले. माझ्या आयुष्यात ज्या आनंदी, प्रेमळ व परोपकारी जोडप्यांचा व माझा परिचय झाला त्या सर्वात मी या जोडप्याला वरचा नंबर देतो.

आपण आयुष्यात जी कमाई करतो तिच्यावर आपला एकट्याचा हक्क नसतो. कमाईचा काही भाग कुटुंबीयांचा असतो, काही भाग सग्यासोयऱ्यांचा असतो. काही भाग इष्टमित्रांचा असतो व काही भाग समाजाचा असतो. ऐपत असणाऱ्या प्रत्येक माणसाच्या कमाईवर समाजाचा हक्क असतो. या हक्काची जाणीव इंदिराबाईंच्या मनीमानसी निरंतर आहे. आपला बराच वेळ व कमाईचा काही भाग त्या समाजासाठी खर्च करतात. वेगवेगळ्या संस्थांसाठी झीज सोसण्याची त्यांना हौस आहे.

अनेक वर्षे कवितालेखन करूनही इंदिराबाईंना कवियत्री म्हणून म्हणावी अशी प्रतिष्ठा प्राप्त झालेली नाही. त्यांच्या अनेक कविता वेळोवेळी, वेगवेगळ्या मासिकांतून जरी प्रसिद्ध होत असल्या, तरी त्यांचा हा दुसराच कविता संग्रह आहे. त्यांच्या मते पहिला नगण्यच. म्हणजे 'मानसमेघ' हाच त्यांचा खराखुरा पहिला कवितासंग्रह. हा संग्रह मोठा काढण्याची त्यांची इच्छा होती. पण ते जमले नाही. तरीसुद्धा जेवढे या छोटया संग्रहातून प्रगट झाले आहे ते माझ्या मताने पुरेसे आहे, कारण ते समाधानकारक आहे. रसिकांची प्रतीक्षा तेवत ठेवील इतके स्नेह या संग्रहात जरूर आहे.

—ग. ल. ठोकळ

# ओळख

कराडच्या कु. शान्ता दीक्षित आमच्या वहिनी सौ. इंदिरा गोविंद कुलकर्णी म्हणून आमच्या घरात आल्या त्याला तीन तपं झाली.

आमचं घर म्हणजे एका कर्तबगार प्राथमिक शिक्षकाचं घर. या घरात सहसा फार आढळात न येणारी विद्येची प्रीती फार होती.

हीच विद्येची प्रीती मनात बाळगून आमचे बंधू वहिनींच्या पाठीशी उभे राहिले. माहेरी असलेली वाचनाची, लेखनाची, स्त्रियांची आवड लग्नानंतर करपून जाऊन समूळ नाहीशी व्हावी, असा सर्वसाधारण अनुभव. पण आमचे बंधू प्रा. गोविंद गणेश कुलकर्णी यांनी वहिनींची काव्याची आवड मरू तर दिली नाहीच, उलट तिला कौतुकाचं खतपाणी घालून मनसोक्त वाढू दिली. आणि आता त्यांची मुलंही आईच्या कौतुकात, गौरवात मनापासून सामील होत आहेत. लेखनावरची वहिनींची निष्ठा ढळली नाही. त्याला हे उत्स्फूर्त सहकार्य काही प्रमाणात साह्यभूत असणारच.

आज कित्येक वर्षे वहिनी काव्यरचना करीत आहेत. उखाणे, डोहाळे, मंगलाष्टकं इत्यादी स्त्रीजीवनातल्या उत्सवप्रसंगी लागणाऱ्या प्रसंगोचित काव्यांचा त्यांचा 'जीवनवेल' नावाचा संग्रह प्रकाशित झालेला आहे. त्यांची गीते आकाशवाणीच्या विविध केंद्रांवरून यशवंत देव, दशरथ पुजारी यांसारख्या मातबरांचा स्वरसाज लेवून प्रसारित होत असतात.

मानसमेघ या संग्रहात त्यांची भावकविता एकत्रित स्वरूपात रसिकांपुढे येत आहे.

' साद मनाची घुमते जेव्हा  
गाऊ लागते लयीत भाषा '

असे त्या स्वतःच्या काव्यजन्माच्या सोहाळ्याचे वर्णन करतात. आज हौस म्हणून काव्यलेखन करणाऱ्या कितीतरी कवयित्रींपेक्षा त्यांची शब्दकळा नीटस, सुजाण आहे. कवितेचा आरंभ कसा करावा आणि शेवट कुठे योग्य होईल याचा योग्य अंदाज त्यांना आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत फापटपसारा फारसा नाहीच.

हे भावजीवन प्रामुख्याने गुंतलेले आहे कौटुंबिक विश्वात. आईच्या आठवणी, भावाची भेट, नव्यानेच शाळेला निघालेला लेक आणि त्याची धांदल, दुसरे बाल्य जपत नातवाला घातलेली मिठी, शतजन्मांची पुण्याई घरात चालून येऊन परब्रह्म घरात खेळणार, या सुखाच्या अनुभवांबरोबरच उरीचे देऊन माघारी निघताना पावलात जडपणा आणणारा कन्यादानाचा किंवा मनाचा नात्याचा तुकडा अलग होतानाचा कटु अनुभव यांची गुंफण या काव्यात आहे. यातली ओवीसारख्या साध्या पण नेमक्या शब्दातली रचना रसिकांच्या पसंतीस उतरावी.

निसर्ग आणि त्यातही पाऊस हा या कवियत्रीचा आणखी एक आवडता विषय. आभाळाच्या धीटाईचा धरतीने स्वीकार केला आणि भास्कराचा जन्म झाला अशी वत्सल मनाला साजेशी कल्पना त्यात आहे तर वळवाच्या पावसाचं स्वागत आहे या शब्दात—

'सचेल घालित स्नान, मनाच्या
भिजतील साऱ्या कडा,
जिकडे तिकडे समृद्धीचा
फिरविल हा चौघडा'

'का दिलेस मजला फुलावयाचे दान' असा आर्त प्रश्न हे मन विचारते तसे 'एवढी ही तृप्ती साठवू कशात ?' असा सुखभरला प्रश्नही विचारते. पन्नास वर्षे सेवा करूनही कुठेही ओलावा न फुटल्याचं दुःख जसं या कवियत्रीला आहे तसं आल्या दुःखाचा सत्कार करण्याचं यजमानपणही तिच्या अंगात आहे.

केवळ स्वतःच्या भावजीवनात मश्गुल न होता, दिवसभर अनाचार करून औषधाच्या गोळ्या घेऊनच झोपू शकणारे महाभाग, किंवा श्रीमंतांच्या गाडीखाली मुंगीसारखा चिरडला जाणारा गरीब माणूस आणि हात 'ओला' झाल्यावर श्रीमंताच्या बाजूने निकाल देणारा पोलीस हाही कवियत्रीच्या नजरेतून सुटलेली नाहीत.

या कवियत्रीच्या कवितेला भक्तीचीही डूब आहे. लोण्याचा लेप तोंडावर बसल्यानं मुका झालेला विठ्ठल तिला दिसलेला आहे.

जनाईचं दळण दळताना घामानं न्हालेला विट्ठल किंवा 'आकाशाची डहाळी खाली लववून, मनाच्या अंगणात प्राजक्ताची रास पाडणारा' ईश्वर या कवितेत आळवला गेलेला आहे.

अशी ही वहिनींची कविता साधी, नेटकी, बहुरंगी. अवघा संग्रह वाचताना माझ्या या म्हणण्याची प्रचीती यावी

इष्टमित्र आणि नातेवाईक यांच्या गोतावळयात वहिनी सुगरण म्हणन नावाजलेल्या आहेत. किती लोक वहिनींच्या हातचा सुबक, चविष्ट पक्वान्नयुक्त स्वयंपाक उपभोगून तृप्त होऊन गेले असतील त्याला गणतीच नाही. पाहुणा आलाय, आता काय करायचं, त्याला जेवायला तर घालून पाठवलंच पाहिजे ना, एखादं पक्वान्नही नको का मेल्यासाठी करायला, असा डोंबलावर घालण्याचा प्रकार त्यात नाही. त्यात अगत्य आहे, तोंडभरलं स्वागत आहे. तऱ्हेतऱ्हेचे पदार्थं करण्याची हौस आहे. भगिनीमंडळांनी घेतलेल्या कितीतरी पाकस्पर्धांत वहिनींनी बक्षिसं मिळवली आहेत. गुजरात राज्याची रसनाराणी असाही किताब त्यांना मिळालेला आहे. अमरावतीच्या भगिनी मंडळाच्या उद्योग मंदिराला त्यांच्या कौशल्याचा लाभ कितीतरी वर्षं झालेला आहे.

वहिनींचं ब्रिजमधलं कौशल्यही असंच वाखाणण्याजोगं आहे. ब्रिजसाठी शनिवार संध्याकाळ ते सोमवार सकाळ असा दीर्घ मुक्काम ठोकून या दाम्पत्यानं कितीतरी स्पर्धा जिंकलेल्या आहेत. त्याची साक्ष त्यांच्या घरातील पेले देऊ शकतील. विणकाम, भरतकाम, हलव्याच्या दागिन्यांसारख्या कला-कौशल्याच्या वस्तू, रुखवताचे जिन्नस या साऱ्यांबाबत वहिनींना प्रचंड हौस तर आहेच. पण त्या हौसेला साजेसं कौशल्यही त्यांच्या अंगात आहे. या त्यांच्या गुणांमुळे त्यांनी कितीतरी कौटुंबिक समारंभांना उजाळा आणलेला आहे.

आमच्या वहिनींनी प्रपंच नेटका केला. बंधूंच्या सरकारी प्राध्यापकाच्या नोकरींमुळे त्यांना अहमदाबाद, धारवाड, अमरावती, औरंगाबाद अशा लांबलांबच्या शहरांतून राहावं लागलं. पण तिथेही त्यांनी आपल्या गुणांनी माणसं जोडली. कला-कौशल्यानं वाहवा

मिळवली. मुलीला पहिल्या वर्गात एम. ए. करून छानसा इंजिनिअर सहचर बघून दिला. दोन्ही मुलगे इंजिनिअर असून थोरला मानाच्या नोकरीत आहे, धाकटा पुढे शिकतो आहे. सूनबाईही सासूबाईंच्या पावलावर पाऊल टाकण्याच्या बेतात आहेत. एक नात अमृता साऱ्यांच्या वात्सल्याच्या वर्षावात न्हाते आहे. आता पुण्यात स्वतःचं घर बांधल्यामुळे वृद्ध सासू–सासऱ्यांची सेवा करायचीही संधी मिळते आहे.

अशा या व्यापात वहिनींनी स्वतःची कविताही जोपासली. कितीतरी मासिकातून त्यांच्या कविता नि गद्य लेखनही प्रसिद्ध झालेलं आहे. आकाशवाणी त्यांची कविता नि श्रुतिका प्रेमानं ऐकवते. कवि-वर्य यशवंत, गिरीश, प्रा. व. दि. कुलकर्णी यांच्यासारख्यांनी त्यांच्या कवितेला मनापासून दाद दिलेली आहे.

कितीतरी कवि–संमेलनातून भाग घेऊन वहिनींनी श्रोत्यांच्या पसंतीची टाळी मिळवलेली आहे. ही कविता घरसंसारात रमणारी, माहेरच्या आठवणींनी व्याकुळ होणारी, सासरहून घरी आलेल्या लेकीचं कोडकौतुक करणारी, कधी संसारातली सुखदुःखं सांगणारी तर कधी ज्ञानदेव–तुकारामांच्या अभंगांनी शांत होणारी अशी आहे.

वहिनींचा पहिला काव्यसंग्रह जीवनवेल. उखाणे, डोहाळे, मंगलाष्टकं अशी स्त्रीजीवनाला हरप्रसंगी उपयोगी पडणारी कविता त्यात आहे. त्यांची पहिली आवृत्ती संपून दुसरीही निघायच्या मार्गावर आहे. वहिनींच्या गीतांना प्रसिद्ध संगीत–दिग्दर्शक दशरथ पुजारी, गजानन वाटवे, स्नेहल भाटकर, अशांसारख्या मातबरांनी गायलं आहे, आकाशवाणीवरून प्रसारित केलं आहे. त्या गीतांचाही संग्रह लवकर निघावा.

आणि आता हा श्री. कानिटकर काढीत असलेला 'मानसमेघ' आयुष्यभर निष्ठा धरून जी कविता जोपासली, वाढवली ती संग्रह-रुपानं प्रकाशित होते आहे यात एक औचित्य आहे. आणि आम्हां सग्यासोयऱ्यांचं समाधानही ! जीवेत शरदः शतम् असं वहिनींप्रमाणेच त्यांच्या कवितेला आम्ही म्हणत आहोत !

**सरिता पदकी**

# मनोगत

माझा हा पहिला काव्यसंग्रह. घरगुती जिव्हाळ्याच्या भावबंधांत माझे स्त्रीहृदय विशेष रमते हे खरेच. ह्या कोमल भावभावनांची अभिव्यक्ती करताना भावसौंदर्याच्या विविध रम्य छटा चित्रित करण्याचा माझा आवडता छंद आहे. ससारातील विविध नात्यांच्या सप्तरंगी इंद्रधनूच्या सौंदर्याने माझं मन नेहमीच मोहरून जाते व त्या सौंदर्याचा आविष्कार रसिकांची दाद घेऊन जातो, त्याचा सुखद प्रत्यय मी वेळोवेळी घेतला आहे.

निसर्गाची रंगरुपे तर किती रमणीय अन् लोभसवाणी. त्या निसर्गसौंदर्यातील विविधरम्यता, भावाकुलता टिपण्याचा प्रयत्न रसिकांनी ध्यानात घ्यावा, महाराष्ट्रात भागवत धर्माची पताका संत महात्म्यांनी उंचावलेली आहे. त्या संतांचा मागोवा घेत मी थोडी पावले टाकलेली आहेत. जीवनाशी मी कृतज्ञ अन् रसज्ञ आहे. शिवाय मानवी जीविताच्या रहस्यमय अंगाकडे लक्ष वेधले तर एक आगळाच अर्थ प्रत्ययास येतो, अन् मानवी जीविताची खोली ध्यानात घेता नियतीच्या सर्वंकष प्रभावाची जाणीव होते. अन् तरीही माणूस अनंत कालापासून चालतो आहे, चालत राहिला आहे, कधी हास्य फुलवीत, कधी अश्रू ढाळीत तर कधी अश्रू फुले उधळीत !

ह्या काव्यसंग्रहाला प्रस्तावना देण्याची विनंती सुप्रसिद्ध कवी व मान्यवर साहित्यिक श्री. ग. ठोकळ यांनी मान्य केली व अल्पावधींत प्रस्तावना दिली याबद्दल मी त्यांची फार आभारी आहे. माझ्या वन्स कवियत्री सौ. सरिता पदकी यांनी कवितांची निवड, कवितांची मांडणी यात आपुलकीने विशेष लक्ष घातलेलं आहे व माझा परिचयपर लेख या काव्यसंग्रहात दिला आहे. त्यांचेहीं मी आभार मानते. 'प्रपंच प्रकाशन' चे उत्साही प्रकाशक व आमचे स्नेही श्री. माधव कानिटकर यांनी माझ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन अल्पावधींत अत्यंत आपुलकीने केले याबद्दल मी त्यांची ऋणी आहे. 'साफल्य प्रिंटर्स' चे

श्री. कुलकर्णी यांनीही छपाईचे काम बिनचूक व सुबक करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांचे आभार. मुखपृष्ठावरील 'मानसमेघास' अनुरुप सुंदर तिरंगी चित्र काढल्याबद्दल बाबू उडपी यांचे व त्यांची सुबक छपाई केल्याबद्दल पॅक आर्टस् यांचे मी आभार मानते. हा काव्यसंग्रह अर्पण करताना मी चतुराई केलेली आहे, अन् मला सतत आपुलकीने प्रोत्साहन देणाऱ्या माझ्या विद्वान पतिराजांचे आभार मानण्याचे सफाईने टाळले आहे हे चतुर वाचकांच्या ध्यानीं येईलच.

माझ्या घरातील सुविद्य पुत्र, कन्या, स्नुषा या सर्वांनाच हा काव्यसंग्रह प्रसिद्ध होताना माझ्याप्रमाणेंच विशेष आनंद होत आहे, कारण ते सर्वजण या संग्रहाच्या प्रकाशनाबाबत उत्सुक होते.

अर्थातच या साऱ्या परिश्रमाचे श्रेय तेव्हाच मिळेल जेव्हा रसिक मराठी वाचकांना यातील काव्यपंक्ती आनंद देतील. मराठी सारस्वतांतील माझे पदार्पण रसिकांनी गोड करून घ्यावे. 'न्यून ते पुरते, अधिक ते सरते, करून ध्यावे ही विनंती.

यातील कित्येक कविता यापूर्वी मानिनी, स्त्री, अनुराधा, माहेर, महाराष्ट्र टाईम्स, वाङमयशोभा, कांचन, माणूस इत्यादी नामवंत नियतकालिकांतून प्रकाशित झालेल्या आहेत. त्या नियत-कालिकांच्या संपादकांचेही आवर्जून आभार मानते. तसेच आकाशवाणी पुणे, नागपूर व मुंबई केंद्र या केंद्रावरून माझ्या कविता व भावगीते प्रक्षेपित होत असतात. त्या केंद्राधिकाऱ्यांचे आभार मानणे मला आवश्यक वाटते.

सौ. इंदिरा कुळकर्णी

आजवरी मी प्रवास केला
हाती घेऊनि समर्थ हात ।
त्याने जपली आणि फुलविली
साहित्याची इवली ज्योत ॥

भाग्य केवढे दिले दयाळा
असा लाभला जीवनसाथी ।
त्या प्रीतीचे, त्या हाताचे
मिरविन ऋण नित माथ्यावरती ॥

-सौ. इंदिरा

# अनुक्रमणिका


| क्रमांक | कवितेचे नाव | पान | क्रमांक | कवितेचे नाव | पान |
|---|---|---|---|---|---|
| १ | अभंग | १७ | २६ | आज मराठी रंगली | ४२ |
| २ | ही कृपा म्हणून | १८ | २७ | ते बाल्य आपुलेची | ४३ |
| ३ | अशी भाग्यवेल | १९ | २८ | आज पन्नास वर्षे झाली | ४४ |
| ४ | दळदळून दळण | २० | २९ | माझ्या माहेराचीं सय | ४५ |
| ५ | अद्वैताचे स्वप्न | २१ | ३० | तुझा माझा तोल जावा | ४६ |
| ६ | अरे प्रारब्धा प्रारब्धा | २२ | ३१ | बाळ निवाला शाळेला | ४७ |
| ७ | सुख टिपताना | २३ | ३२ | भाग्ये परिसाची | ४८ |
| ८ | कंठा आले प्राण | २४ | ३३ | ओढ लावी कसलीशी | ४९ |
| ९ | दिलंय ते सव्याज परत मिळावं | २५ | ३४ | पेरलं होतं की | ५० |
| १० | लेक आली माहेरला | २६ | ३५ | परीसाच्या तुझ्या हाते | ५१ |
| ११ | जिवाच्या आकांतानं | २७ | ३६ | संसार करावा | ५२ |
| १२ | वाटलं नव्हतं | २८ | ३७ | खरं आहे तुझं | ५३ |
| १३ | आवेग नदीचा | २९ | ३८ | दुःख माझे संपू नये | ५४ |
| १४ | पदचिन्हांच्या पादुका | ३० | ३९ | विसाव्याची गावे | ५५ |
| १५ | मला कळत का नव्हतं | ३१ | ४० | आपुल्याच तालामध्ये | ५६ |
| १६ | दातारानें दिली | ३२ | ४१ | युगायुगांची पायतळीची | ५७ |
| १७ | झालं ना मनासारखं | ३३ | ४२ | झडे आगळीच वर्षा | ५८ |
| १८ | वळवाच्या पावसाची | ३४ | ४३ | आले नुकतीच सासरी | ५९ |
| १९ | पाहुणा | ३५ | ४४ | शाप | ६० |
| २० | आवर्तांत आवर्त मिसळावं | ३६ | ४५ | शतजन्मांची पुण्याई | ६१ |
| २१ | साद मनाची घुमते जेव्हा | ३७ | ४६ | कोरडी मी परी घरी | ६२ |
| २२ | श्रेयात नाहते त्याची | ३८ | ४७ | योग्य आहे हेच सारे | ६३ |
| २३ | मलाच मालवून गेलास | ३९ | ४८ | ताटातुटी | ६४ |
| २४ | आई | ४० | ४९ | ज्याचे होते त्याने नेले | ६५ |
| २५ | सारं समोरचं संपल्यावर | ४१ | ५० | रिता शिंपला नसावा | ६६ |

५१ असं का पाहतोस ६७
५२ तोडणे हसत बंध जिव्हाळयाचे ६८
५३ तुझ्या माझ्यातले देणे ६९
५४ आभरणे तुझ्या स्मृतींची ७०
५५ माझा लाडका म्हणून ७१
५६ माहेरचा दीप ७२, ७३
५७ मी नाही कुठे म्हणतेय ७४
५८ तेल घाला हो कुणी ७५
५९ रागावलाहेस ना ७६
६० मला द्यायचे होते ७७
६१ आज कितीक दिसांनी ७८, ७९
६२ आकाशाची डहाळी ८०

## अभंग

बाळल्या गात्रांत
  फुलला मोहोर
    मनींचे माहेर
      भेटी येता ।। १ ।।

आंधळ्या दृष्टीत
  तेजाचा उमाळा
    पाहतां सावळा
      तुडुंबला ।। २ ।।

निष्प्राण शरीरीं
  चैतन्य उमले
    लागतां पाउलें
      अहिल्येसी ।। ३ ।।

• • •

## ही कृपा म्हणू–

का दिलेस मजला फुलावयाचे दान ?
अन् निर्मिले सभोंती रान असे वैराण

दररोज फुलावे आणि सुकावे येथे ।
हे उफाळणारे विश्व मरोनी जाते ।।

हे फुलणे, फुलणे, फुलणे कोणासाठी ।
दुर्दैव कसे हे, माझीच मजवरी वृष्टी ।।

बघ अवघ्या देही तुडुंब भरली वीज ।
या वैराणी मज कशास असला साज ।।

हे पुरे पुरे मज, फुलणे आणि सुकणे ।
ही कृपा म्हणू की अवकृपेचे देणे ।।

## अशी भाग्यवेल !

संसाराची वाट, चालता चालता
फुललेला झेला, कधी येतो हाता ।।

कुरवाळीतो मी, तीच अपूर्वाई
भाग्याचा कलश, ओसंडून जाई ।।

वाटते अवघी, पुण्याई फळली
अनंताची सुखे, पदरात आली ।।

सावरू बघते, भरला पदर
आकाशून जाते, इवली नजर ।।

एवढी ही तृप्ती, साठवू कशात
ब्रह्मांडाएवढे, मज देई हात ।।

परिसाच्या हाते, ओतलेस धन
परिसच झाले, तन आणि मन ।।

अशी भाग्यवेल, फोफावू दे दारी
अखंड वर्षू दे, चिमण्यांचेवरी ।।

० ० ०

# दळदळून दळण

दळदळून दळण
घाम विठ्ठलासी आला ।
टिपताना जनाईचा
शेव भिजुनिया गेला ॥

काय माहीत जनीला
शेव होईल मोत्यांचा ।
भाववेड्या भक्तीवर
आळ येईल चोरीचा ॥

० ० ०

# अद्वैताचे स्वप्न

अद्वैताचे स्वप्न कोवळे हंसे पाळण्यात
अर्थ उद्याचा भरूनी सांडतो इवल्या ओठात ॥

साफल्याची तार रूणझुणे जीवनवीणेची ।
अवघ्या देही साद कोंदली वत्सल स्पर्शाची ॥

सार्थकतेच्या कल्पतरूवर कोंभ नवे फुटले
तृप्तधरेच्या क्षितिजकडेंवर बालबिंब हसलें ॥

भाग्यवती मी स्वप्न पाहते जागृत राहून
कृष्ण कन्हैय्या गोकुळवाला मिठीत घेऊन ॥

पारायण मग हवे कशाला
वेद पुराणांचे ॥

वत्सलतेच्या कुशीत उमले
सार अनंताचे ॥

० ० ०

## अरे प्रारब्धा प्रारब्धा –

अरे प्रारब्धा प्रारब्धा
दूर का रे पळतोस
तुझ्या मुठीत घेऊन
माझ्या ललाटीची रेष ।

आजवरी ओंजळीने
सुख मुखी भरविले ।
हाती अंगुली धरूत
वैभवाचे गंख दिले ।

तूच माणिक मोत्यांचा
सडा शिंपलास दारी
समृद्धीच्या ओतल्यास
भरभरूनी घागरी ।

आणि आज अचानक
का रे जातोस एकटा
साऱ्या पुसून मोडून
माझ्या जीवनाच्या वाटा ।

० ० ०

# सुख टिपताना –

सुख टिपताना आले
पदरात दुःख वेडे
आलेल्याला सत्कारावे
गृहस्थीचे मला धडे ॥

परी असावी रे दुःखा
तुला सुखाची झालर
प्रारब्धाच्या मांडवाला
जपेन मी जन्मभर ॥

नाही करीत कुर्कुर
तूही रहा माझ्यापाशी
काय अवखळ बाळा
माय ठेविते उपाशी ॥

• • •

# कंठा आले प्राण

लोणियाचा लेप, मुखावरी दाट
परि नाही ओठ, खोलायाचे ।

भर्जरी वस्त्रांचा, भोवताली खच
नाही हवे तेच, नेसायाचे ।

रोज अंघोळीस, दूध तूप दही
मात्र पोटी खाई, पेटलेली ।

पर्वत ओसंडे, समोर धान्यांचा
मिळे नामयाचा, घास दैवे ।

जवाच्या माळेला, विटे रखुमाई
रोज हट्ट घेई, नव्यासाठी ।

ऐकतात प्रभू, हसती मनात
सारे तिजोरीत बडव्यांच्या ।

मिळतो प्रसाद, आल्या गेल्या येथ
मात्र जगन्नाथ, उपवासी ।

अथांग अनंत, त्याचीच वसुधा
युगे युगे बंदा, वीटेंवरी ।

नको ऐसे भोग, नको देवपण
कंठा आले प्राण, भोगताना ॥

० ० ०

## ‘दिलंय ते सव्याज परत मिळावं …’

दिलंय
ते सव्याज परत मिळावं
म्हणून मुळीच नव्हे ।

पण
दिलेल्या आनंदाची
परत स्वाक्षरी
निदान पावती तरी !

तेवढाही आनंद
वाटयास येऊ नये काय परमेश्वरा !

अन् म्हणतोस
दानत सर्व आहे
परमानंद आहे !

• • •

## लेक आली माहेराला –

लेक आली माहेराला । कौतुकाला काय उणे ।
मायबाईची धांदल । किती काय विचारणे ।। १ ।।

जाई जुई मोगऱ्याला । दिला कधीचा बोलावा ।
सुगंधाच्या राशीने हो । माझ्या बाईला सजवा ।। २ ।।

आणा आणा माळीयांनो । छान टपोऱ्या अंगुरा ।
बहु दिसांनी पातली । बाळ लाडकी माहेरा ।। ३ ।।

गोठ्यातील गौराबाई । लेक आली घरा आज ।
चार दिवस वासरा । जरा थोडे थोडे पाज ।। ४ ।।

'बरं का हो, ऐकलं का ? । करा बाजार सत्वर ।
बाळ तान्हेली भुकेली । जेवू घालीन लौकर' ।। ५ ।।

'म्हणे, वाजलेत थोडे । असे घाई तुझी फार ।
भूक लागाया उशीरा । हे का आहे हो सासर ? ।। ६ ।।

येई पाखरू गोजिरे । मायेसाठी ना माहेरा ।
करू कुरवंडी सदा । जिवाभावाची संपदा ।। ७ ।।

लेकीबाईचा ग जन्म । चार दिसांची पाहुणी ।
डोळे पुसत खुशीनें । करायाची पाठवणी ।। ८ ।।

० ० ०

# जिवाच्या आकांतानं

जिवाच्या आकांतानं, धावत गेलीस कशाला ?
अन्
खळखळ बरसलीस कशाला ?
पायाखालच्या काळ्या खडकावर
बरस बरस बरसलीस
पण एकाद्या कातळाला तरी
फुटला का अंकुर ?
किंचित तरी थरथरली का
त्याची एकादी कड ?
नाही ना ! झालं तर
आणि शेवटी तू मात्र
आपणच बरसून
निर्माण केलेल्या डोहात
पार बुडून गेलीस ।।

• • •

# वाटलं नव्हतं--

वाटलं नव्हतं
तू नाही म्हणशील म्हणून
ओंजळीत पडलेलं फूल हुंगायला
आतापर्यंत

हवं हवं चा ध्यास घेतला होतास ना ?
अन् आत्ताच असा
अरसिक कसा झालास ?

का हे ढोंग आहे सारं
अरे, कदंबतळीचा पावा
रोज घुमवलास

नी फुलविलीस ना
ही राधिका वृंदावनीची

अन् आता आकांतानं
सारं सोडून तोडून

ती तुझ्याकडे धावत धावत आलेय
तर वेड्या,

आता का मिटलेस तुझ्या मनाचे पंख
तिच्यावर नित्य सावली धरणारे ?

• • •

## सुख-दुःख

सोसून सोसून सरेल
ते दुःख कसलं ?

अन्
भोगून भोगून उरेल
ते सुख कसलं ?

० ० ०

# पदचिन्हांच्या पादुका

वाटतं, कुठून तरी बसवावा
चुकलेल्या वाटेचा मेळ
पण कसा ?

वाटेला तर असतात
अनंत पाय फुटलेले
अन् मला हव्या असलेल्या गावाची
'वाडीकडे'

अशी कुठेच अस्तित्वात
दिसत नाही खूण–
वाटतं, कुठे तरी खुणा

कुणाचे तरी ठसे
कुणीतरी दाखवतील

ह्या मार्गावरून जाता जाता उमटविलेले
पण छे !

ते तर बेटे सारेच मशगुल
आपल्याच पदचिन्हांच्या पादुका
गौरवानं स्वत:च्याच माथ्यावर मिरवत।

• • •

# मला कळत का नव्हतं ?

मला कळत का नव्हतं
की वाहत्या प्रवाहाला घालू नये बांध
बांध घालताना
पायाखालची वाळू ढासळणार आहे
लाटांची मैफल आदळणार आहे
पाण्याच्या भोवऱ्यांत,
सापडणार आहे

अन्
भरतीच्या लाटांनी
प्रतिकूल वाऱ्यांनी
क्षितिजाच्या काठावर
मनाचा बांध फुटणार आहे !

पण तरीही,
सारा जन्म बांध घालण्यात गेला
ढासळती वीट सावरण्यात गेला
एकच ध्यास, वळवावा प्रवाह चाकोरी सोडून
या जन्मी नाही तर
पुन्हा पुन्हा जन्म घेऊन !

• • •

# दाताराने दिली

दाताराने दिली
कमाई सगळी
तरी त्याची झोळी सुटेचना ।।

असे कसे झाले
अपात्री हे दान
अवघे हे पुण्य, बाया गेले ।।

झिजविला देह
जोजविली शीळा
येईना उमाळा, परी तीस ।।

अगा, तुवा सारीं
पुण्याई सांडली
बीजे पडियेली, वांझे पोटी

# झालं ना मनासारखं ?

झालं ना मनासारखं ?
घेतलंस ना जग मुठीत
तुझ्या नजरेच्या क्षितिजांनी वेढलेलं।
तरीही का ढासळतेस अश्रू
ऊरपोट रिकामं करून।
जेव्हा निघाली होतीस प्रवासाला।
पावलावर पाऊल टाकून
गुलाबाच्या गालिच्यावरून
पण वेडे, अखेरच्या मुक्कामापर्यंत।
पसरलेत का कुणी
गुलाबाचे गालिचे
कुणासाठी आजवर
रुतायचं कुठंतरी बोचरं कुसळ !
पण कुसळांची फुलं करण्यातच
खरं जीवन आहे.

० ० ०

# वळवाच्या पावसाची

वळवाच्या पावसाची ।
कळे का ग वेळ कुणा ।
कधी येतो आणि जातो ।
अनाहूत हा पाहुणा ।।
रिमझिम नावडे त्या ।
सदा यायचा नाचत ।
सांडे उत्साहाची मूस ।
एका क्षणाच्या भेटीत ।।
कधी वाटावे अंतरी ।
आज येऊ दे ती सर ।
परि कधी ना यायची ।
होता मानस अधीर ।।
-- आणि अचानक बाई ।
कधी जागवितो झोप ।
यावे दौडत दर्शना ।
तोच कुठे होई गप्प ।।
नको न कळत असा ।
जाऊ पीसाटापरीस ।
माझ्या आनंदाचा घडा ।
नको पालथा करूस ।।
दोन क्षण थांबून जा ।
तुज साठविते मनी ।
असा लपंडाव नको ।
तृप्ति भरू दे लोचनी ।।



० ० ०

# पाहुणा

अमृतधारा झरझर वर्षित
आला ग पाहुणा ।
जाता जाता ठेवुन जाईल
कितीक आपुल्या खुणा
असा तसा ग नव्हे पाहुणा
करील बेभान
उधळित जाइल नव चैतन्ये
कणाकणातून ।

सचैल घालिल स्नान, मनाच्या
भिजतिल साऱ्या कडा
जिकडे तिकडे समृद्धीचा
मिरविल हा चौघडा ।।

आज असा श्रीमंत पाहुणा
नभातुनी आला
स्वागत त्याचे अनंत हस्ते
आपण करू या चला ।

० ० ०

## ‘आवर्तात आवर्त मिसळावं’

आवर्तात आवर्त मिसळावं
तसं, दिवस रात्रीच्या ह्या गुंत्यानं
वेढलं आहे, हे आयुष्य ।
लाचारीचं खावं, बुरख्यात मिरवावं
मानहानीत खचलेली मान
मानभावीपणे वर करून
अन् केलेल्या पापांना गाडण्यासाठी
रात्री औषधांच्या जोरावर
शिकस्तीनं मिटावी पापणी, क्षणभर
आपल्याच पापाच्या फटकाऱ्याने
दचकेपर्यंत ।

अन्
पुन्हा लाचारी, पुन्हा बुरखा
पुन्हा झोप, पुन्हा दचकणे
सारे सुरूच ।
वेड्या, अन् यालाच म्हणतोस
सोज्वळ जीवन ।

० ० ०

# बेलभंडार उधळीत प्राणांचा

कोण म्हणतंय तू चुकशील म्हणून
वाट पुसत जा ना अभंगांना
इंद्रायणी काठाने
ज्या संतांच्या टाळ मृदुंगाचा नाद
मार्गावरचा कण कण गातोय ।
ऐक चक्षूंचे कान करून, तुझ्याचसाठी उधळल्या आहेत
ह्या कस्तुरीच्या सुगंधी वाटा ।
तुझ्याचसाठी घेऊन बसलेत ज्ञानोबा नि तुकोबा
ही हरिनामाची कावड
तळमळणाऱ्या देहावर शिंपडायला ।
म्हणून म्हणतो, वेडया,
का भितोस ?
उचल तुझ्या देहाची परडी
आणि जा
बेलभंडार उधळीत प्राणांचा ॥

० ० ०

# श्रेयात नाहते त्याची

अर्पून भावना साऱ्या
आयुष्य हरवुनी बसले
आसमंत होउनी गोळा
म्हणतसे पुरी मी फसले ।।

वनवासी जगते आहे
आळवीत बेसूर ताना
हे दान अपात्री ठरले
वाटते सर्व लोकांना ।।

मी फसावया का वेडी
माझे मज सारे कळते
दाविता दया का खोटी
भवताली जमुनी येथे ।।

ठाऊक असे का तुम्हा
मी दानशूर दैवाची ।
कल्पना कुठे वेड्यांना
श्रेयात नाहते त्याची ।।

० ० ०

## मलाच मालवून गेलास--

किती पेटवलं पेटलाच नाहीस
भरतीच्या लाटांनी भिजलाच नाहीस
बरसत्या धारेत न्हालाच नाहीस
दंवाची फुलं पाहून डंवरलाच नाहीस
मेघाच्या संगतीत ओलावलाच नाहीस
शरदात फिरलास पण मोहरलाच नाहीच
का ? -- का ?

अन्
काहीच नको होतं
कधीच फुलणार नव्हतं
तर -- तर
मग आलास कशाला इथं ?

पण
असा आलास
अन् मलाच मालवून गेलास !

• • •

# आई

आई टाकून गेलीस, दुःख आभाळी मावेना
झाली जिव्हारी जखम, तिसी फुंकर मिळेना ।।

जीव रोज पाखडते, जग आपुले म्हणून
तुझ्या वात्सल्याचा अंश । परि कोठे गवसे न ।।

मन व्याकुळ शिणे । तुझी आठवता माया
रोम रोम आसुसतो । तुझ्या मूर्तीस पहाया ।।

याच व्यवहारी जगी । मी ग हासते बोलते
वर वरून पाहता । मोठ्ठी आनंदी दिसतें ।।

पण काय सांगू आई । मनी डोंब उसळतो
तुझ्या उणीवेने माते । सारा फुलोरा गळतो ।।

किती दिवस जाहले । तुला तरी गमे का ग
क्षण राहिलीस आम्हा । कधी सोडून का सांग ।।

तूच नेत्रांच्या दीपात । स्नेह मायेचे घालून
झाली दीपस्तंभ आम्हा । ज्योत मनाची लावून ।।

त्याच ज्योतीच्या तेजात । आज धीराने चालते
येवो संकटाची रास । तरी तमा न करते ।।

लाख मोलाचे संस्कार, तुवा आम्हावरी केले
त्याच वैभवांच्यामुळे । मान समाजात मिळे ।।

तुझा कौतुकाचा स्पर्श । आणि आशीर्वाद थोर
द्याया तू ग येई वेगे । वाट पाहाती लेकरं ।।

० ० ०

## सारं समोरचं संपल्यावर

द्यायला आसुरले होते
तेव्हा तोंड फिरवलंस
अन् आता
अनंत वर्षांचे दरवाजे ओलांडून
आला आहेस इथवर
आणि पाहतो आहेस रोखून
याचनेच्या नजरेनं
आतुरल्या शरिरानं
वेड्या, आत्ता आलाहेस खरा
पण सारं समोरचं
संपल्यावर
पूर्ण निवल्यावर ।।

# आज मराठी रंगली

आज मराठी रंगली
नाचे आळंदीची धूळ
ज्ञानयाच्या समाधीची
लागे हुंकाराया शीळ ॥

गात इंद्रायणी नाचे
हाती घेऊन अभंग ।
तुकयाच्या स्पंदनात
झाली इंद्रायणी दंग ॥

रोज मोत्यांचे भरण
पडे जनीच्या जात्यात ।
अठरा विश्वांची दरिद्री
घेई साथीसी अनंत ॥

झाली माहेराची घाई
संत सखूच्या पाउला ।
प्याली भक्तीचा श्रीरंग
सारा देह परिसला ॥

० ० ०

# ते बाल्य आपुलेची

ते बाल्य आपुलेची
वृद्धत्व घे मिठीत
तो वर्तमान भूत, हो स्नात संगमात ।

बर्फाळ दीठ पाही,
आले समीप तीर
नेत्रात वेदनांचे, भरले तुडुंब नीर ।

आहे दुजास आली
आता कुठे नवाई
ब्रह्मांड पाहण्याची, हो पाऊलास घाई ।

अस्तास चाललेले
ते तृप्त हास्य ओठी
गात्रास वाटताहे, धरिले जगास पोटी ।

हे दोन ध्रुव कसले
एकाच कुंडलीचे
आकार सान मोठे, एकाच मृत्तिकेचे ।

ती अस्मिता मिठीत
आकाशुनी नहाते ।
इवल्या दिठीत त्याच्या
ब्रह्मांड दाखवीते ।।

० ० ०

# आज पन्नास वर्षे झाली

खोटं नाही सांगत,
    आज पन्नास वर्षे झाली ।
सेवेचा पाऊस अहोरात्र पडतो आहे ।
    पण एक कोपराही नाही
    अजून ओलवला तापलेल्या आभाळाचा ॥
जन्मांची आवर्तने केली
तरीही टाकणार आहेका पळस
    एकादं फूल तरी पदरात ॥
नाही तर,
    नाहीतर
    दिवस रात्रीच्या या कोरड्या फेऱ्यात
शेवटी,
    प्राणांचा वृक्षच उन्मळून पडेल,
    या
        सेवेच्या पाऊलांवरच ॥

० ० ०

# माझ्या माहेराची सय

माझ्या माहेराची सय । जशी पाडाची ग कैरी ।
गोड गाभूळ रसाळ । तिची अवीट माधुरी ।।

माझ्या माहेराची सय । जसं पोवळं मधाळ ।
जिवाभावाच्या प्रीतीची । झरी वाहते निर्मळ ।।

माझ्या माहेराची सय । जसं पुनव चांदणं ।
दाटे मधुर स्मृतींनी । माझ्या मनाचं अंगण ।।

माझ्या माहेराची सय । जसा पहाट गारवा ।
एका एका झुळकीत । रंग उत्साहाचा नवा ।।

माझ्या माहेराची सय । जशी आषाढीची झड ।
एक आठव काढता । होई लाखांची चवड ।।

माझ्या माहेराची सय । जसा बकुळीचा गंध ।
सदा धुंद करायाचा । माझा माहेराचा छंद ।।

० ० ०

# तुझा माझा तोल जावा

तुझा माझा तोल जावा
घट उतास जाताना ।
लय श्वासांची थांबावी
मी तूं पण भंगताना ॥

क्षण यावी बधीरता
स्वरांतल्या सारंगीत
तार तार रंगा यावी
तुझ्या माझ्या अंगुलीत ॥

तुझ्या माझ्या बोलण्याने
विसरावा शब्दकोश ।
मुखीं गर्द तांबुलाचा
भिजो अमृतात घास ॥

स्पंदनाचा ताल ठेका
लय विसरून जावा ।
संतृप्तीचा आर्द्र मेघ
अनंतात पाझरावा ॥

असे कांही जन्मा यावे
जेणें विश्वा जन्म द्यावा ।
उन्मेषाच्या ओंजळोत
पुण्याईचा अर्घ्य व्हावा ! ॥

○ ○ ○

# बाळ निघाला शाळेला

नको पुसू शेजीबाई । आज धांदल कशाची ।
चाले गडबड भारी । बाळ शाळेला जायाची ।। १ ।।
छोटया राजीवाचं सारं । व्हाया नको वेळेवर ।
झाले पहाटेस जागी । नको शाळेला उशीर ।। २ ।।
मन जाई गोंधळून । कसा सजवू बाळास ।
ठाकठीक हवे सारे । आज पहिला दिवस ।। ३ ।।
'लाल चड्डी घालू तुला । का रे आवडे निळीच '।
शुभ्र शर्टात शोभतो । बाळ माझा ग भारीच ।। ४ ।।
अहो कालच आणिले । त्याच्या पिताजींनी बूट ।
लाडके ना चिरंजीव । रोज पुरविती हट्ट ।। ५ ।।
डावीकडे भांग खुले । मुखावर पावडर ।
जरा कलती घालते । निळी हॅट डोक्यावर ।। ६ ।।
बाळ पोचला दारात । सारं मुसळ केरात ।
'अहो थांबवा ना त्याला । डबा राहिला घरात ।। ७ ।।
कालपासून तयार । लाडूकरंज्याचं ताट ।
'कशी वेधळी पहा मी । नाही राहिलं ध्यानात '।।८।।
डबा दप्तर घेऊन । बाळ निघाला ऐटींत ।
थांब आणते दृष्टीला । मीठ मोहरी त्वरीत ।। ९ ।।
खळखळ नाद झाला । रिक्षा थाबली दारात ।
बाळ निघाला शाळेंत । रिक्षा चालली वेगात ।।१०।।
मीठ मोहऱ्यांची मूठ । तश्शी राहिली हातात ।
राजू असेना शाळेंत । दृष्ट काढिते मनांत ।। ११ ।।

० ० ०

# भाग्ये परिसाची

आभाळाने केली
धिटाईची बात
धरतीचे ओठ
ओलावले ।

आणि तिला झाली
कसनुशी बाधा
बरा झाला सौदा
आभाळाशी ।

भाळी भरा तिच्या
प्राचीची पिंजर
ओटीत भास्कर
घाला तिच्या

भाग्ये परिसाची
उफाळून आली
कांचनाची मूस
उरी पोटी ल्याली ।

०  ०  ०

# ओढ लावी कसलीशी !

पावसाची झड बाई
ओढ लावी कसलीशी ।
विरहीण तळमळें
रूपे तिला गादी उशी ।।
मोरपिसे नाचताना
हुरहुर मनीं दाटे ।
जळभ-या मेघापरी
येतील का कान्त वाटे ।।
आसुसले नभ काळे
धरणीला भेटायाला ।
अशा गूढ अवकाशी
साथ तुझी हवी मला ।।
रिते झाले गगन हे
तारा गेल्या घरोघरी ।
वर्षाकालीं कोण बाई
भटकती रात्रभरी ।।

• • •

# पेरलं होतं की–

पेरलं होतं की
कधीतरी उगवेल म्हणून ।
खतपाणी घातलं, भरल्या आयुष्याचं
देहाचे शंभर हात करून ।
रात्रीला दिवस मानला अन्
जोजावत बसले मातीआडचं प्राक्तन ।
एकच आशा धरून बसले
ते देईल मला सावली जन्माची ।
ज्याच्यांत मी प्राण ओतले आहेत
अन् म्हणून एकच ध्यास घेऊन बसले
त्याला फुलविण्याचा
पण--आज तर झाली संध्याकाळ
तरी येईना हं मातीला जाग ।
सारे कण कसे थिजलेले, जगण्याचं विसरलेले
अन् धरती पण विसरली का प्रसवण्याची क्रिया ।
ओतलं जिवाचं ब्रह्मांड
समजू का सारंच गेलं वाया ?

० ० ० ० ० ०

# परीसाच्या तुझ्या हाते

हिंदोळ्यास हिंदोळता हिंदोळते माझे मन ।
विस्मृतीच्या गवाक्षांत डोकावती जुने क्षण ॥

प्रीतगर्भ रेशीमाने विणियेली भावफुले ।
मत्त गंध विखुरती हृदयात दाटलेले ॥

असा जीवनफलक सरकतो वीजेपरी ।
टिपताना भावकण भांबावते वेड्यापरी ॥

मनोमनी अंकुरले आठवते तुझें नाते ।
सागराच्या भरतीने भरे माझे विश्व रिते ॥

शिळोप्याची बैसले मी सोडूनिया खुले मन ।
एका एका माणकाचे पारखते आज धन ! ॥

तन, मन, घर माझे, येता तूच उजळले ।
जनाईच्या झोपडीत जाणो ब्रह्म साकारले ।

परीसाच्या तुझ्या हाते अणू अणू कवळिला ।
सोनियाची झाले पुरी भाग्य येई बहराला ! ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२३९२ वि. क्र.
२२५२८
ठाणे (स्थळ प्र.)

# संसार करावा

संसार करावा । करावा नेटका ।
अहंभाव फुका । धरू नये ।। १ ।।

संसाराचा उभा । कल्पवृक्ष परी
याचना न करी । अहोरात्र ।। २ ।।

गुणांचे माहेर । संसारी असावे ।
सेवेसी कसावे । तन मन ।। ३ ।।

संसारा न आदी । हव्यासा न अंत ।
माझियाची खंत । करू नये ।। ४ ।।

संसारावा दिवा । दीपस्तंभ व्हावा ।
अंधार मिटावा । पापीयांचा ।। ५ ।।

श्रद्धेचा फुलोरा । वहावा संतांसी ।
जेणे माहेरासी । नेऊ केले ।। ६ ।।

पंढरीचे पुण्य । पिकावे संसारी ।
इथे मुक्ति चारी । भेट व्हावी ।। ७ ।।

• • •

# खरं आहे तुझं !

तुझं खरं आहे रे
पण रस्ते अनेक
आणि आरपार असले तरी

बंधनाचे कोट
त्याहूनही अनंत असतात ना ?

म्हणून सांगू
असे करू या का ?

तुझ्या माझ्या प्रवासाला निर्मू या
अकरावी दिशा

दाही दिशाचे साखळदंड तोडून
चोहोकड पसरलेले

सारे आखीव रेखीव विस्कटून
तुझ्या माझ्या पायांना बांधू या
गुलाबाची फुले

काटयांनी रक्तबंबाळ झालो
तरी देतील सुवास कधी तरी

म्हणून म्हणते

अनंत युगांच्या व्रताचं उद्यापन करायला
प्रतीक्षेचे हात नव्या वाटेच्या साक्षीनं गुंफून
करू या अनंताच्या प्रवासाला सुरवात

० ० ०

# दुःख माझे संपू नये

मिटलेल्या डोळियांत, सुख दुःख साठवीतो ।
उसळत्या सागराची, उधळण शांतवितो ।।

रेंगाळत देह माझा, सुख दुःख सीमेवरी ।
उन्ह छायेच्या कुशीचा, साज चढे माझ्यावरी ।।

वेदनेत उन्नतीचा, परीमल डोकावतो ।
म्हणूनिया दुःख माझे, उरी पोटी सांभाळतो ।।

पंचप्राण वितळावे, दुःख भोगता भोगता ।
गावो कंटकांची शेज, माझ्या सुखाची संहिता ।।

लाट उरी उसळावीं, वेणाभरल्या भाग्याची ।
अनंतांत शांत व्हावी, माझी मासोळी देहाची ।।

दुःखवेडी पाझरावी, वर्षा शीतल संतृप्त ।
गारठावे शांत व्हावे, रोम रोम फुलवीत ।।

मागतो मी एक देवा, दुःख माझे संपू नये ।
आकांक्षांची महाद्वारे, मिटलेली पाहू नये !।।

० ० ०

# विसाव्याची गावे

दैव प्रारब्ध ही
मोठी मोठी नावे ।
विश्वमार्गातली
विसाव्याची गांवे ।।

थकली पाऊले
इथे थांबतात ।
जगण्यासारखे
कांहीं शोधतात ।।

गवसता कण
नियतीचे दारी ।
आंबल्या पायांत
पुन्हा ये उभारी !।।

• • •

# आपुल्याच तालामध्ये

आपुल्याच तालामध्ये
राजरस्ता वाहताहे
धुंदावल्या धनिकांनी
शिगोशिग भरलाहे ।।

कोण कुणा विचारतो
जरतारी दुनियेत ।
दारिद्र्याने पिचलेला
मात्र पथीं ठेचाळत ।।

कार नवी धावताहे
नागिणीच्या आवेशांत
मुंगीपरी चिरडते
गरीबाची क्षुद्र जात ।।

पाहुनिया दृश्य दीन
कुणी लाल हेलावतो ।
उसन्याच धाडसाने
शेटजीला दटावतो ।।

पोलिसांच्या चौकशीचे
थोडे नाटक रंगते ।
मूठभर नोटांमध्ये
सारे पाप वितळते ।।

पुन्हा तीच धुंद डोळा
तीच कार नवी कोरी
फुत्कारत मिरवीते ।
कांहीच ना झाल्यापरी ।।

# युगायुगांची पायतळीची

युगायुगांची पायतळीची
वीट जीर्ण झाली ।
ब्रह्मपदाचे अमोल लेणे
जन्म जन्म ल्याली ।।

पुंडलीका रे पुन्हा थांबवी
भक्तांच्या भक्त ।
ही प्राणांची वीट नवी घे
देण्या भगवंता ।।

० ० ०

## झडे आगळीच वर्षा–

झडे आगळीच वर्षा
येई सुवासाला जाग
स्पंदनाच्या जाणिवेला
फुटे अमृताचा कोंभ ॥

साकळली मनोमनी
तृप्ती अनंत जन्माची
संतृप्तीच्या पाकळीत
भाग्ये दाटली स्वातीची ॥

साठविता भाग्यराशी
कर सहस्र मागती
ब्रह्मांडाच्या ओंजळीत
सारी साफल्ये फुलती ॥

• • •

# आले नुकती सासरी

किती समजावू माझ्या ।
मूढ अवखळ मना ।।
आले नुकती सासरी ।
सुरू माहेराच्या वेणा ।। १ ।।

स्मृतिवर्षावाची झड ।
सुचू देना काम धाम ।
किती आवरू भावना ।
गेलें बावरून मन ।। २ ।।

जाय हातांतले बळ ।
कांही पडते, सांडते ।
उसळती आठवण ।
उरि थैमान घालते ।। ३ ।।

स्मृति खट्याळ आणीते ।
सवे आषाढीची झड ।
बांध अभंग मनाचा ।
जाई फोडून पल्याड ।। ४ ।।

• • •

## शाप

चुकलें असेन, झाले असेल जरा दुर्लक्ष
म्हणून दुर्वासा सारखा
जन्म जन्म न भेटण्याचा
का बरं द्यावा शाप

खरं तर, आजवर
युगे युगे सेवेची अंजली रिती केलीय
उरी दाटलेल्या भक्तीच्या उमाळ्यानं
पण तू असा रे कसा
क्षणात सारी सेवा वाया घालविणारा ।

छोटासा हविर्भाग अर्पून
किती जणांचा उद्धार झालाय
माहीत का नाही तुला
अरे, मूठभर पोह्यानं, सोन्याची नगरी
मिळाली

उष्ट्या बोरांनी, देह परीस झाला
भाकरीच्या घासासाठी
नाम्याची शीळा सजीव झाली
असं असताना, प्रेमाच्या अंगणात सतत
बरसणारा तू
नको होतास, आटायला ॥

० ० ०

# शतजन्मांची पुण्याई

शतजन्मांची पुण्याई । आली चालून घरांत ।
सान परब्रह्म खेळे । माझ्या मायेच्या कुशींत ॥

पूर्ण गौर्णिमेचा चांद । माझ्या दारी विसावला
नित अमृतधारांनी । न्हाऊ घालितो मजला
शीत निर्मल निर्झर । झरे अखंड ओसरी ।
तृप्ति आकंठ माझिया । जन्मजन्मांची ॥

माझ्या सजल्या गोकुळि। नंद नदाचा रांगत ।
लाख वर्षाची वर्षली । दारीं भाग्याची खैरात
लाख विश्वांच्या नृपाळा । मी हो तुम्हाहूनी मोठी
परब्रह्माचे कौतिक । जन्मा आलं माझ्या पोटी ॥

० ० ०

## कोरडी मी परी घरी

उसळती नवे कढ
भांबावुबी जाय मन
पांघराया थिटे पडे
आकाशाचे पांघरूण ।

वर्षावानें जग न्हाहे
कोरडी मी परी घरी
आसवांच्या ओलाव्याने
ओली सुकी होते उरी ।।

प्रकाशाचे पेव फुटे
तुडुंबल्या दाही दिशा
आंधळ्याच्या प्रारब्धात
मात्र दाटे अमावास्या ।।

० ० ०

# योग्य आहे हेच सारे

योग्य आहे हेच सारे
असेच हो व्हावयाचे
उपदेश करण्याला, येती लोक शेजारचे ॥

जोवरी ना जावयाची
वेळ आली पैलथडी
तोवरी समजते, कशी भरी हुडहुडी ॥

करायास किती सोपा
उपदेश काही बाही
बेतेल ते त्यांच्यावर, तेव्हा कळेल धिटाई ॥

असे बरे तसे बरे
सांगायाला काय होते
सारे त्याला कळतसे, हातातून ज्याच्याते ।

हेच खरे म्हणूनिया
केले सर्वांनी हैराण
मागूनिया आता सुचे
मला सारे शहाणपण ॥

० ० ०

# कोरडी मी परी घरी

उसळती नवे कढ
भांबावुबी जाय मन
पांघराया थिटे पडे
आकाशाचे पांघरूण ।

वर्षावानें जग नाहे
कोरडी मी परी घरी
आसवांच्या ओलाव्याने
ओली सुकी होते उरी ।।

प्रकाशाचे पेव फुटे
तुडुंबल्या दाही दिशा
आंधळ्याच्या प्रारब्धात
मात्र दाटे अमावास्या ।।

० ० ०

# योग्य आहे हेच सारे

योग्य आहे हेच सारे
असेच हो व्हावयाचे
उपदेश करण्याला, येती लोक शेजारचे ।।

जोवरी ना जावयाची
वेळ आली पैलथडी
तोवरी समजते, कशी भरी हुडहुडी ।।

करायास किती सोपा
उपदेश काही बाही
बेतेल ते त्यांच्यावर, तेंव्हा कळेल धिटाई ।।

असे बरे तसे बरे
सांगायाला काय होते
सारे त्याला कळतसे, हातातून ज्याच्याते ।

हेच खरे म्हणूनिया
केले सर्वांनी हैराण
मागूनिया आता सुचे
मला सारे शहाणपण ।।

० ० ०

# ताटातुटी

ढगाळल्या आभाळाचे
मन कशात लागेना ।
उमलाया विसरले
काय जाहले कळेना ।।

निळ्या निळाईची आज
कशी हरवे आरास ।
कोण्या विरहा कारणे
त्याचा लोपला उल्हांस ।।

इंद्रधनूच्या झुल्याची
कशी मोडली कमान
तारकांच्या संगे
आज लागेच ना मन ।।

सारी झळाळी सोडून
वल्कले ही कशासाठी
आवडीच्या कुणा संगे
झाली वाटे ताटातूटी

० ० ०

## ज्याचे होते त्याने नेले

ज्याचे होते त्याने नेले
कोठी पोटी घालमेल
सांभाळाया दिले काही, कसे आपुले होईल ।।

काही दिले देणाराने
जिवापाड जपायाला
बांध फुटला देताना, तरी हवा गिळायाला ।।

जिवापाड जपताना
नाही कधी उमगले
असे हे की दुसऱ्याचे, साफ विसरून गेले ।।

ठेव जपली जपली
प्राण आणून डोळ्यात
पंख उडायास दिले, आता उगाच आकांत ।।

ओथंवला मेघ गळे
विरहाचा येता वारा
गंध नेणाऱ्याने नेला, हाती राहिला फुलोरा ।।

० ० ०

# ' रिता शिंपला नसावा '

वत्सलता स्तनातली
यावी बनूनिया स्वाती ।
बाळ कुशीत वाढावा
जसा शिंपल्यात मोती ॥

त्याची इवलीशी मिठी
मायमायेत भिजावी ।
घट्ट मिटल्या मुठींत
सुख अंकुरास यावी ॥

पाझरत्या पान्ह्यामध्ये
सप्ततीर्थे उसळावी ।
बहरावे सूर्यफूल
ओटी भाराने लवावी ॥

असा सांडता बहर
जन्मभरी ओटी घ्यावा ।
मोठा होईना का बाळ
रिता शिंपला नसावा ॥

० ० ०

## 'असं का पाहतोस'

असं का पाहतोस
पारा गेलेल्या आरशासारखा
अंधुकशा दृष्टीनं

कुठं गेली तुझी ती झळाळणारी दिव्य द्रीष्टि
ज्यांत मीं चांदणी होऊन वावरत होते
पौर्णिमेची सप्तरंगी पिसे लेवून नाचत होते
अन् काय रे तूच ना

माझं आंधळेपण तुझ्या दृष्टीत तुडुंब भरलंस
मग आज
असं तुझ्या डोळस स्पर्शाचं रुक्ष कोरडेपण

का जाणवतं आहे
मला पुन्हा खरीच आंधळी करणार
पाराच नसलेल्या आरशात
पाहिल्यासारखं

० ० ०

## तोडणे हसत बंध जिव्हाळ्याचे

पावलात माझ्या
आले जडपण
निघाले माघारी
उरीचे देऊन ।।

उमगले तेव्हा
होते परक्याचे
रक्त शिंपूनीया
फक्त रक्षायाचे

झाडले मी हात
सारे आवरून
कृतार्थ तू बाई
गाती सर्व जण ।।

अर्पुनीया सारे
शेव झटकीला
आगळाच ऐसा ।
सौदा बाई झाला ।।

हेच आहे का रे
सार जीवनाचे
तोडणे हसत
बंध जिव्हाळ्याचे ।।

० ० ०

## तुझ्यामाझ्यतले देणे

तुझ्या माझ्यातले देणे घेणे
कधीच पुरे झालेय
अन् तुडुंबलेले आपण दोघे
हिंडून आलो की सारं आभाळ

चांदण्याची पिसे लेवून

बघ,
अजून हुळहुळताहे माझं अंग अंग
तुझ्या घट्ट मिठीत वितळलेलं

बघ तरी
नजरेच्या पिसाऱ्याने घेतलेले
चुंबनठसे
अजून कसे ताजे आहेत

अन् आज आत्ता
रुपये आणे पैचं
कधी न सुटणारं
गणित घालून

का
का
मला
माणसांतून उठवतोहेस ?

० ० ०

## आभरणे तुझ्या स्मृतींची

वाटलं –

दाटलेलं सारं ठेवलं इथं
अन् निघाले मोकळी होऊन

छे –

पण मोकळी कसली आल्येय
तू तर नसोनसी भरलेला आहेस
श्वासांची फुले होऊन ।
आणि पसरली आहेस आभरणे
तुझ्या स्मृतींची
माझ्या वाटेवर ।
अरे, मीच गात चालल्येय
तुझ्याच कंठानं
जीवनगीत तालासुरांत ।
तू पेरलेली आहेस ना मनावर
दंवांची रिमझिमती फुले
त्याच मोत्यांचा साज लेवून
मी आपली रुणझुणते आहे
न कळत पावलागणिक ।

० ० ०

# माझा लाडका म्हणून

सतावतोस सारखा
असे बोलून बोलून
तुझे राखिते मन
माझा लाडका म्हणून ।

तुझे राखिते मी रंगणारे मन
कधी क्रोधानल होते
तेव्हा वणव्यात त्याच्या
मी रे पुरती जळते ।

नको करूस कुर्कूर
सारखा रे मजपाशी
तुझ्या हळव्या मनाची
कळे मला कासाविशी

तुझे लडीवाळपण
पुन्हा पुन्हा डोकावते
माझ्या विचारी मनाला
मोठ्ठे साकडे घालते ।

दोन शरीराचे पण
एक दिलाचे आपण
उन्ह सावलीत खेळू
हात हातात गुंफून ।

• • ०

# माहेरचा दीप

आज माहेरचा दीप
माझ्या लागला दारात
कोन कोन मानसींचा
उजळला पुनवेत ।।

माय माऊलीची छाया
आली भाऊच्या रूपात
मी ग तुडुंब नाहले
माहेरच्या जान्हवीत ।।

माया निथळू लागली
कशांतून पाठीवर
आणि मनाच्या गाभ्यात
फुटू लागला पाझर ।।

मज निरखून पाही
माय भाऊच्या डोळ्यानी
तिचा पान्हावला जीव
मज दिसतो इथूनी ।।

माझ्या जिव्हाळ्याचे धागे
भाऊपाशी उकलीते
स्निग्ध मायेची गुंफण
पुन्हा विणून ठेवतें ।।

आली माहेरची हवा
माझ्या भाऊच्या पाउली
आठवणींच्या कोषांत
लाख पारवे घुमली ।।

किती हिरव्या सकाळी
भाऊ खेळता रंगल्या
का रे, आठविती तुला
मित्र मैत्रिणी सगळ्या ।

आई भाऊ ताई दादा
आणि मैत्रिणींचा मेळा
तोच वाहतो दुथडी
नित्य माझ्यात जिव्हाळा ।।

माहेरात फुललेले
असे मायेचे ताटवे
रोज हुंगत शोधिते
पैलू जीवनाचे नवे ।।

० ० ०

## मी नाही कुठे म्हणतेय

मी नाही कुठे म्हणतेय
एकदा म्हटलंच आहे ना
की दिलंय तुला
पण, पण म्हणून माझी सारी सत्ताच संपली

असे म्हणू नयेस. तू
दिलेय, हा माझा चांगुलपणाच
नव्हे का ?

तो क्षणभर स्मरावास
आणि कधीतरी कधीकाळी
तुझा म्हणूनच ग
माझ्याजवळ द्यावास
क्षणभर गोंजारण्यासाठी
क्षणभर कुरवाळण्यासाठी

अगं किती दिलंय म्हटलं तरी
मनाचा तुकडा का अलग करता येतो ?
हा सारा पाण्यावर मारलेल्या
काठीसारखा खेळ आहे ग !

० ० ०

# तेल घाला हो कुणी

आजवर फाटलेलें आयुष्य
शिवता शिवता
स्मृतींच्या थकलेल्या हातांचे
आताशी लागलेंत टाके चुकायला ।
शहाण्यांच्या उपदेशांच्या ठोकरा खात खात
हे फळ काहीच न देता
मातीत मिसळणारस दिसतेय
वांझोटचा पोटी
तसं तर टाक्यांनीच व्यापलंय सारं आभाळ
पण, देण्या घेण्याच्या व्यवहाराचा
कधीच जमला नाहीय हिशोब
ह्या उभ्या आयुष्यात ।
सतत वजाबाकीचे हे ऋण ह्या धूर्त जगानं
व्याजापोटीच फेडून घेतलंय
अन् कसेबसे सांधलेलें हे टाके
हज्जारदा उसवतेय ही स्वार्थाची तीक्ष्ण नजर
पण वेडा मी
मी मात्र हाडांची जुडी बांधत बांधत
निसटलेल्या धाग्याना गाठी मारत मारत
अजूनही फिरतोय 'तेल घाला हो कुणी माथ्यावर
असे म्हणणाऱ्या अश्वत्थाम्यासारखा ॥

• • •

# रागावलाहेस ना

रागावलाहेस ना
मग घे की बोलून
पण हा मुका मार
हा मला होरपळून काढतोय
वणव्यासारखा
अन् बर्फासासारखी ही तुझी थंड नजर
मलासुद्धा शिळा बनवतेय रे
प्रिया
दिशा दिशानाही
तटातट तोडणारा तुझा आवेग
असा निखळून पडलेला पाहणं
या परता
सारं संपलेलंच
बर की

० ० ०

# मला द्यायचे होते

मला कधीचे द्यायचे होते
पण देताना हात थरथरत होते
वेड्यासारखे
तसं तर मनानं सारं देऊन
कधीच मोकळी झालेय
तो कितीदा तरी आला दाराशी
अपेक्षेचे हात पसरून
मोठ्या उत्कंठेनं, आवेगानं
पण, लज्जेचा पडदा फाटतच नव्हता
महापूर गर्जत होता
पण, किनाऱ्याची कड काही फोडीत नव्हता
खरं तर, त्याच्या नजरेतलं वादळ
मला कळत नव्हतं असे नव्हे
त्यामुळे माझी देहलता
मोहरत नव्हती असंही नव्हे
पण, सारा गदारोळ मनात मावत नव्हता
तरीही खुळ्यासारखी
कोंबतच होते आतल्या आत
पण एक दिवस अघटित घडलं
सारा आवेग एकत्र झाला
सारी बंधने तटातट तुटली

० ० ०

## आज कितीक दिसांनी

आज कितीक दिसानी
माझी ओसरी भरली
मामा भाचरांची येथे
मोठी बैठक रंगली ।

अरे, किती सतावता
आल्या आल्याच मामाला
खूप लांबचा प्रवास
शीण नसेल का आला

नको बोलू ताई त्याना
ऐकू दे ग किलबील
चिमण्यांच्या संगतीत
शीण पळून जाईल ।

बघ सांगाया एकेक
आता आळीत जातील
मामा आला, मामा आला
सूर सनई वाजेल ।

बरी आहे ना रे आई
वहिनी नी सारीजण
रोज लागते उचकी
कोण काढी आठवण ।

पहा वेंधळी कशी रे
मी ही राहिले बोलत
चहा फराळाचे सारे
आत चालले निवत ।

दूध कालच घेतले
आज बासुंदी कराया
किती दिसानी घालते
तुला हातचे जेवाया ।

घे ना रे थोडी बासुंदी,
नाही आवडली काय
आले ध्यानात बरं का
झाली वहिनीची सय ।

आज बुडुनिया गेले
तूप साखरेत मन
भाऊराया तुझ्यासंगे
आले माहेर हिंडून ।

निघालास एवढ्यात
पुन्हा कधी रे येणार
सांग आईला, सुखाचा
आहे ताईचा संसार ॥

० ० ०

## आकाशाची डहाळी

आकाशाची डहाळी
खाली लवली
अन्
माझ्या मनाच्या अंगणात
पडली प्राजक्ताची रास !

शेवटचा दीस
गोड होण्यासाठी
मिटलेल्या देहावर ! ! !

• ◦ ◦

REFBK-0022528
REFBK-0022528

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 23e2 वि.३. / 22520
संद. शाखा (स्थळ